61

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ६४ वी बैठक**

| | |
|---|---|
| बैठक दिनांक | दिनांक १७ जुलै, २०२१ |
| ठिकाण | व्हीडीओ कॉन्फेरन्स द्वारे |
| वेळ | सकाळी ११.०० वाजता |

# बैठकीचे इतिवृत्त

**बैठकीस उपस्थित सदस्यांनी सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांची एकमताने बैठकीचे अध्यक्ष म्हणून निवड केली.**

**विषय क्रमांक. १: - सन्माननीय सदस्यांच्या रजे बाबत.**

**सर्व सन्माननीय सदस्य बैठकीस व्हीडिओ कॉन्फरन्स द्वारे हजर होते.**

**विषय क्रमांक. २ : दर्गाह बुरहान शाह वली व इदगाह सर्वे क्रमांक ६३६ व ६३७, परभणी ही वक्फ संस्था वक्फ अधिनियम, १९९५ चे कलम ६५ अन्वये वक्फ मंडळाच्या रास्त नियंत्रणात घेणेबाबत.**

दर्गाह बुरहान शाह वली व इदगाह सर्वे क्रमांक ६३६ व ६३७, परभणी या वक्फ संस्थेची व तीच्या मालमत्तेची नोंद महाराष्ट्र राजपत्र दिनांक ०२.०५.१९७४ भाग सी अनुक्रमांक १२२ वर नोंदणीकृत आहे. तसेच सदर संस्था व तिची मालमत्ता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये वक्फ मंडळात नोंदणीकृत असून याचा नोंदणी क्रमांक मरावमं/नोंदणी/पबन/३७/२०१० व २८/२०१० आहे. या वक्फ मिळकतीची मालमत्ता सर्वे नं ६३६ क्षेत्र २० एकर १२ गुंठे व सर्वे नं. ६३७ क्षेत्र २ एकर १९ गुंठे परभणी महानगर पालिका हद्दीत आहे. जिंतूर रोडवरील ईदगाह सर्वे नं. ६३६ चा भाग आहे. जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांच्याकडुन वेळोवेळी देण्यात आलेल्या अहवालावरुन असे निषपन्न होते कि ईदगाह हद्दीतील सर्वे नं. ६३६ मधील मिळकतीवर ३० ते ४० दुकाने बांधुन भाड्यावर देण्यात आलेल्या आहेत व भाडेवर देण्यात आलेल्या लोकांकडून देणगी म्हणून मोठी रक्कम घेण्यात आलेली आहे. सदर व्यवहार या कार्यालयाकडून कोणतीही पूर्व परवानगी न घेता करण्यात आलेले आहेत. श्री. साबेर अली पिता कमर अली हे स्वंघोषित मुतवल्ली असून कब्रस्तानच्या जागेमध्ये कबरीची नासधूस केल्याचे निष्पन्न झाल्यावर जिल्हा वक्फ अधिकारी परभणी यांनी पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजिष्टर क्रमांक ०३१५ दिनांक २२.०६.२०२१ रोजी नोंदविला आहे.

वरील प्रमाणे सर्व बाबीं या कार्यालयाचे निदर्शनास आल्याने प्रादेशिक वक्फ अधिकारी श्री. खुसरो खान यांची दिनांक ०५.०७.२०२१ रोजी सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली व त्यांना निर्देश देण्यात आले की, सदर प्रकरणी या संस्थेची सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा.

(62)

चौकशी अधिकारी श्री. खुसरो खान यांच्या दिनांक ०६.०६.२०२१ च्या अहवालावरून असे स्पष्ट होते की, सदरील वक्फ मिळकती मध्ये एकूण ४४ दुकाने वक्फ मंडळाची परवानगी ना घेता टीन शेड बांधून भाड्यावर देण्यात आलेली आहेत. व श्री. साबेर अली या इसमानी भाडेकरूंकडून लाखों रूपयांची अनामत रक्कम वसूल केली आहे. मागील ८ ते १० वर्षापासून श्री. साबेर अली यांनी लोकांकडून भाडे करारपत्र न करता व भाड्याची पावती न देता परस्पर लाखो रूयये भाड्यापोटी वसूल केली आहे. व वर्ष २०१३ पासून लेखा परिक्षण अहवाल वक्फ मंडळात दाखल केलेला नाही. तसेच सदर वक्फ संस्थाचे मुतवल्ली म्हणून नेमणूकीसाठी अर्ज दिलेला नाही. व या कार्यालयामार्फत त्यांना रितसर मुतवल्ली म्हणून नियुक्ती करण्यात आलेली नाही.

तक्रारदार शेख अब्दुल शेख बाबू प्रो. न्यु एस.के. ट्रेडर्स, परभणी यांच्या तक्रारीवरून असे दिसून येते की त्यांनी इदगाह परिसरातील वक्फ मिळकतीपैकी ४०X३० जागेवर फर्निचरचे दुकान चालवण्यासाठी साबेर अली सोबत भाडेकरार केला आहे, व मासिक भाडे रू. १५०००/- व अनामत रक्कम रू.१५०००००/- श्री. साबेर अली यांना देण्यात आले आहेत. व शेख अब्दुल यांचेकडून २०१६ ते २०२० दरम्यान रू.१५०००००/- घेण्यात आले. असे एकूण रू. ३१०००००/- साबेर अली यांनी घेतले आहेत. तक्रारदार यांनी परभणी येथील नानलपेठ पोलीस स्टेशन मध्ये सदरील व्यवहारामधील वादाबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

एकंदरीत परिस्थितीचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, सदरील वक्फ संस्था व त्याची मालमत्ता ही बेजबाबदारपणे व अनाधिकृत व्यक्ति मार्फत हाताळण्यात आलेली आहे. सदर वक्फ मालमत्ता समाजिक व धार्मिक कामासाठी दान करण्यात आलेली आहे. अशा परिस्थित कोणत्याही व्यक्तीस किंवा देखरेख करण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्तीस या संबंधी स्वतःच्या हितासंबंधासाठी गैर व्यवहार करता येणार नाही.

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ प्रमाणे वक्फ मालमत्ता भाड्याने देण्यासाठी वक्फ बोर्डाची रितसर पुर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. अन्यथः भाडेकरार अवैध आहे. सदरील प्रकरणात वक्फ मिळकती मधील जागा अनधिकृतपणे भाड्याने देण्यात आलेली आहे व त्यावर बांधकाम देखील करण्यात आलेले आहे, जे वक्फ मालमत्ता भाडेपट्टा अधिनियम २०१४ चे नियम २० पोट नियम २ नुसार बेकायदेशीर आहे. चौकशी अधिकारी यांच्या अहवालावरून स्पष्ट होते की, मागील १० ते १२ वर्षापासून वक्फ मिळकतीवर विना परवानगी बांधकाम करून दुकाने भाड्याने देण्यात आलेली आहेत व भाडेपोटी मोठी रक्कम वसूल करण्यात आली असून सदर रकमेचा वक्फ मंडळाकडे लेखाजोखा देण्यात आलेला नाही. म्हणजे प्रथमदर्शनी असे दिसून येते की, रकमेचा अपहार संबंधितांनी केलेला आहेत. व ही रक्कम स्वतःच्या वापरासाठी घेण्यात आलेली आहे.

या कार्यालयामार्फत जो पर्यंत सदर वक्फ संस्थेच्या देखभालीकरिता योग्य व्यक्तीची नेमणूक करण्यात येत नाही तो पर्यंत वक्फ संस्थेच्या हिताच्या दृष्टीने सदर वक्फ संस्था व त्याची मालमत्ता वक्फ मंडळाच्या रास्त नियंत्रणाखाली घेणे गरजेचे आहे. या करिता वक्फ मंडळाच्या बैठकीत सदर विषय ठेवण्यात येत असून दर्गाह बुरहान शाह वली व इदगाह सर्वे क्रमांक ६३६ व ६३७, परभणी या वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीत घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

(अनिस शेख)
मुख्य कार्यकारी अधिकारी

63

ठराव क्रमांक. १: - दर्गाह बुरहान शाह वली व इदगाह सर्वे क्रमांक ६३६ व ६३७, परभणी ही वक्फ संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६५ अन्वये वक्फ मंडळाच्या रास्त नियंत्रणात घेण्यात यावी यासाठी अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी. सदर वक्फ संस्थेच्या मालमत्तेचा प्रत्यक्षात ताबा घेण्यात यावा. सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी तात्पूरती तदर्थ समिती नियुक्त करण्यात यावी. अतिक्रमणधारकांना वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५४ नुसार नोटीस देऊन कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. सदर ठराव एकमताने मान्य करण्यात आला. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू करण्यात यावी.

| अ. क्रं. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | मा. खासदार डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. अध्यक्ष, | [signature] |
| २ | मा. खासदार सय्यद इम्तियाज जलील<br>मा. सदस्य | [signature] |
| ३ | मा. डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. सदस्य | [signature] |
| ४ | मा. श्री. एम. एम. शेख<br>मा. सदस्य | |
| ५ | मा. ॲड. खालीद बाबू कुरैशी<br>मा. सदस्य | [signature] 1/9/2021 only for 17th July-2021-online meeting- |
| ६ | श्री. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य | [signature] |
| ७ | मा. ॲड. ए. यु. पठाण,<br>मा. सदस्य | [signature] |
| ८ | मा. श्री. इम्तियाज मुश्ताक काझी,<br>सह सचिव शालेय शिक्षण व क्रिडा विभाग<br>तथा मा. सदस्य | |

[signature]

**Chief Executive Officer**
**Maharashtra State Board of Waqfs**
**Aurangabad.**